Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# मराठी बालसाहित्य : स्वरूप आणि महत्त्व

*सचिन शंकर पालवे*
*सहायक प्राध्यापक*
*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ*
*sachinpalve.77@gmail.com*

## शोध सारांश

बालसाहित्यातील सैद्धांतिक बैठकीचा मुख्य आधार हा बालमानसशास्त्रावर आधारित आहे. मुलांचे व्यक्तिमत्व त्यांच्या भावनिक, तार्किक, सर्जनशील विकासासाठी, बालकांच्या वाढ आणि विकासाच्या टप्प्यावर त्यांचे मानसशास्त्र समजून आवश्यक आहे . भाषा हे भावना आणि विचार व्यक्त करण्याचे सशक्त माध्यम आहे त्यामुळे मुलांना समजून घेऊन बालसाहित्याचा आशय आणि अभिव्यक्ती असावी. अनुभवविश्वाची समृद्धी हे साहित्याचे वैशिष्टय आहे. बालपणी मुलांच्या मनाची पाटी कोरी असल्यामुळे मुलांना जो अनुभव व साहित्यानुभव मिळतो त्याचा कायमचा प्रभाव मुलांवर असल्याचा दिसून येतो, याची जाणीव साहित्यनिर्मिती करतांना बालसाहित्यीकांनी आणि वाचनसंस्कार करतांना पालकांनी व शिक्षकांनी ठेवावी.

## प्रस्तावना

'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे...' असं केशवसूत म्हणाले ते आपल्या सर्वांसाठीच लागू आहे. लहान मुले अगदी छोट्याश्या गोष्टीतून सुद्धा आनंद मिळवतांना दिसून येतात. विश्वात नव्यानेच प्रविष्ट होणाऱ्या बालकाला अपार विश्वकुतूहल असते. बोलता येऊ लागताच हे काय आहे?', ते काय आहे?', असे का?', तसे का?' इ. अनेक प्रश्न बालक प्रौढांना विचारत असतात. विश्वातील अनंत वस्तूंची उपयुक्तता आणि कृतींचा हेतू याविषयी अनभिज्ञ असल्यामुळे त्याची कृती अहेतुक आणि निरागस असते. वाढत्या वयाबरोबर कुटुंब आणि समाज यांच्या प्रभावामुळे उपयुक्ततेचे भान वाढत जाते व कृती व्यावहारिक हेतूंनी बंदिस्त होत जाते, तसतशी अहेतुकता आणि निरागसता लोप पावून बालाचे प्रौढामध्ये रूपांतर होतांना दिसते. ही अहेतुकता आणि निरागस विश्वकुतूहल आपल्या कृतीतून अबाधित राखू शकणारे काही थोडे प्रौढच कलावंत ठरतात. उलट बालांमध्ये ही शैशववृत्ती निसर्गतःच असते. शैशववृत्तीसह, संवेदनशिलता, अनुभवसमृद्धता, जिवनाविषयीचा शाश्वत दृष्टीकोन जपण्यासाठी बालसाहित्याची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याची दिसून येते.

**मुख्य शब्द - साहित्य, बालवाङ्मय , बालमानसशास्त्र , व्यक्तिमत्व विकास**

## बालसाहित्याचे स्वरूप

मुले हे राष्ट्राचे भविष्य आहे आणि बालसाहित्य ही राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. बालसाहित्याची निर्मिती सर्वोच्च प्रकारचे सर्जनशील कार्य आहे, त्यासाठी अलौकिक प्रतिभाशक्ती आणि जाणिवेची सशक्तता बालसाहित्यिकाजवळ असणे गरजेचे आहे. बालसाहित्याचे स्वरूप ठरवतांना अनेक भारतीय व पाश्चात्य बालसाहित्यिकांनी आपल्या अभ्यास चिंतनाद्वारे बालसाहित्याच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

बालसाहित्याच्या लेखिका मालती दांडेकर यांच्या मते 'जे साहित्य बालांच्या आवडत्या रसांनी समृद्ध असूनही बालवाचकांच्या बुद्धीच्या, समजुतीच्या कक्षेत येवू शकते तेच बालसाहित्य.' गोपीनाथ तळवलकर यांनी म्हटले आहे कि . 'बालमानांच्या ज्या गरजा, अपेक्षा व मर्यादा असतील त्या लक्षात घेऊन लिहिलेले जे वाङ्मय त्याला बालवाङ्मय म्हणता येईल, जे वर्णन केले आहे त्याचे चित्र मुलांच्या डोळ्यापुढे उभे राहिले पाहिजे.' गोपीनाथ तलवलकर व मालती दांडेकर यांच्या विवेचनावरून बालसाहित्याचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट होतांना आपल्याला दिसून येते.

लहान मुलांना सृष्टीतील प्रत्येक वस्तू नवी असते. त्या वस्तूकडे ती सांकेतिक दृष्टीने पाहत नाहीत . त्यांच्या मनात पूर्वग्रह नसतात प्रत्येक वस्तूची ती नव्याने ओळख करून घेत असतात. बालकांना आजूबाजूच्या प्रत्येक वस्तू आणि घटना जाणून घेण्याची उत्सुकता असते, त्यांच्या जिज्ञासेला योग्य दिशा देण्यासाठी प्राचीन भारतीय वाङ्मय समृद्ध होते. बालकथांचा उगम ख्रिस्तपूर्व दोनशे वर्षापूर्वी पंचतंत्र च्या रूपाने झाला संस्कृत भाषेत असणाऱ्या या कथांमध्ये पात्रं ही प्राणी आहेत. या प्राण्यांना माणवी गुणधर्म देऊन त्यांच्या माध्यमातून कथा लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणे इसापनिती चा काळ इसवीसन पूर्वं सहाशे वर्ष असा मानला जातो. इसापनीतीतल्या कथाही पंचतंत्राप्रमाणेच मनोरंजनाबरोबर नीती आणि व्यवहारचातुर्याच शिक्षण देणाऱ्या आहेत. तात्पर्य हेच की या ग्रंथकारांच्या मनात मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची रूपरेषा निश्चित असेल. रविंद्रनाथ टागोर यांच्या मते 'बालकांच्या मनासारखे पुरातन दुसरे काहीही नाही, देश, काल, शिक्षण, प्रथा ह्यायोगे प्रौढ माणसाचे किती नवनवे परिवर्तन झाले आहे. परंतु बालक मात्र शेकडो वर्षांनूर्वी जसे होते तसेच आजही आहे. हेच अपरिवर्तशील पुरातनत्त्व मानवाच्या घरी आजही बालमूर्तीच्या रूपाने जन्म घेत आहे. या नूतन चिरंतनत्वाचे कारण असे की, बालक ही मुळी प्रकृतीची निर्मिती आहे, परंतु प्रौढ मनुष्य ही बहुतांश माणसाने स्वत:च बनविलेली कृती आहे.' रवींद्रनाथ टागोरांचा असा विश्वास आहे की मुलांच्या कोमल, शुद्ध आणि स्वच्छ मनासाठी अशाच साध्या आणि नैसर्गिक बालसाहित्याची गरज आहे.

बालमन समजल्याशिवाय लिहिलेले वाङ्मय हे बालवाङ्मय होऊ शकत नाही. मुलांचे भावविश्व वेगळे असते. प्रौढ माणसांना अर्थहीन आणि विसंगत वाटणारे साहित्य मुलांना अर्थपूर्ण वाटत असते. त्यांचे मन अदभुतरम्य आणि कल्पनाशक्तीने भारलेले असते. कल्पनेवर भरारी मारण्याची त्यांची सदैव तयारी असते. व्यवहारी जगाच्या कूटनीतीची त्यांना जाणीव नसते. प्रत्येक गोष्टीतून आनंद मिळवण्यासाठी ते कायम उत्सूक असल्याचे दिसून येतात. अश्या या बालमनाची आवड-निवड ओळखून साहित्यिकांनी सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण केले पाहिजे. त्यांच्या भाषेत, त्यांचे मनोरंजन, ज्ञानवर्धन करणारे भाव-भावनांना आवाहन करणारे त्याचप्रमाणे बालमानसशास्त्राची जाणिव ठेवून लिहीलेले साहित्य बालसाहित्य म्हणता येईल. जिज्ञासा, कुतूहल, निसर्गाशी एकरूपता, प्राणी-पक्षी यांची आवड, कल्पनारम्यता, मनोरंजनप्रियता, अनुकरणप्रियता, सहानुमूती संवेदनशिलता इ. बालमनाचे गुणधर्म कमी अधिक प्रमाणात सर्वत्र दिसून येतात. या गुणवैशिष्ट्यांनी यूक्त बालसाहित्य असावे.

Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

## बालकांच्या वाढीचे व विकासाचे टप्पे आणि बालसाहित्य

कोणत्या वयोगटासाठी बालवाङ्मय लिहावे? ह्या बाबतीत विविध विचारवंतामध्ये अनेक मतमतांतरे आढळून येतात. यासाठी बालमनाच्या गुणधर्माचा विचार केल्यानंतर बालकांच्या वाढीचे आणि विकासाचे टप्पे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. डॉ. सुलभा शाह यांनी सांगितल्याप्रमाणे 'शिशू - बालजिवनाची पहिली अवस्था 1 ते 5 वर्षांपर्यंत, बाल - 5 ते 10 , किशोर - 10 ते 13, कुमार - 13 ते 16' अशी मुलांच्या वयाची विभागणी या चार अवस्थेमध्ये, स्थूलपणे आपल्या करता येईल. प्रत्येक वयोगटातील मुलांची आवड-निवड, प्रेरणा, प्रवृत्ती, वेगवगळया असतात. मुलांची वाढ ही ठराविक एका पद्धतीने असते परंतू प्रत्येक अवस्था ही ठराविक एका कालाची कधीच नसते. शिशू अवस्थेत मुलांचा शारिरीक, मानसिक विकास तीव्र गतीने होतो. तर शालापूर्व व शालेय जिवनात ही वाढीची गती मंदावते. या चारही अवस्थांची जाणिव ठेऊन लिहीलेले साहित्य बालवाङ्मयात अंतर्भूत झालेले दिसून येतील.

## बालसाहित्याचा आशय आणि अभिव्यक्ती

दोन ते पाच वर्षां पर्यंतच्या बालकांना लिहीता वाचता येत नसल्यामुळे चित्रमय पुस्तकांची अपेक्षा असते. या वयात बालकांना ताल, लय, नादनुकारी शब्द त्याचप्रमाणे शब्दांमध्ये पुनरावृत्ती असेल तर मुल एकाग्र होतांना दिसून येते. उदा. शिशूगीते. अंगाईगीते. बाल्याअवस्थेतील सात ते दहा वयोगटातील मुले कर्मेंद्रिंये व ज्ञानेंद्रिंये चा कौशल्याने उपयोग करतांना दिसून येतात. आपल्या सभोवतालच्या बाह्य जगाविषयी त्यांना आकर्षण असते. चौकसपणा व जिज्ञासूवृत्ती, कुतूहलवृत्ती वाढलेली असते. या वयात मुलांचा भाषिक व बैध्दीक विकास होत असतो. बाल्याअवस्थेची आत्मप्रतिष्ठा, संघप्रियता,सामाजिक प्रवृत्तीचे विकसन, कल्पना शक्तीचे आकर्षण ही वैशिष्टये सांगता येतील. यासाठी मुलांच्या विचारांना, तर्कबुद्धीला, कल्पनाशक्तीला चालना देणारे बालवाङ्मय लिहायला हवे. किशोरअवस्थेत प्रामुख्याने मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होत असते. साहसवृत्ती, संग्रहप्रवृत्ती, विधायक प्रवृत्ती या वयात मुळ धरू लागते तर अनुकरण प्रवृत्ती प्रबळ असते. आदर्शवत थोर पुरूषांची 'चरित्र वाङ्मय' त्यांना समजेल अश्या भाषेत लिहायला हवे. राग, लोभ, द्वेष, साहस या सर्व गुणांचा, अवगुणांचा परिपोष या वयात त्यांच्या मनात झालेला असतो यासाठी चांगल्या आणि वाईट गोष्टींची जाणिव बालवाङ्मयातून करून देणे येथे क्रमप्राप्त ठरते.

किशोरवस्था नंतर पुढे कुमारवस्थेला सुरवात होते. या अवस्थेत मुले काल्पनिक गोष्टीपेंक्षा वास्तववादी दृष्टीकोनातून विचार करतांना दिसून येतात. भा. रा भागवत यांनी कुमारवयातील मुलांसांठी म्हटले आहे की 'कुमारवयातील मुले अदभुताकडून वास्तवकडे वळलेली असतात त्यांना कर्तृत्व दाखवणारे वीर हवे असतात, जादूचा दिवा घासून श्रीमंत होणाऱ्या अलाद्दीनपेक्षा अनेक संकटात गटांगळया खाऊन स्वत:च्या हिमतीवर कर्तुत्व गाजवणारा वीरनायक त्यांना जास्त आवडतो.' कुमार वयातील मुलांना जे वाईट आहे त्याचा नि:पात करावा असे वाटते. जुने मोडून नवे बांधावे असे त्यांना वाटते. वाङ् मयातील सत्यदर्शनकडे ते वळू लागतात पण

Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

सत्यातून उपदेशाचे डोस नको असतात. कुमारवस्थेत कृतिशिलता, उद्योगप्रियता चपळता हे गुण तर आळस, निष्क्रियता, ध्येयवादाचा अभाव हे दुर्गुण दिसून येतात. तारूण्यापूर्वीचा हा संक्रमणकाळ भावनिक अस्थिरतेचा असल्याचा दिसून येतो, त्यांच्या वर्तनात एकाचवेळी सकारात्मक आणि नकारात्मक बदल ठळकपणे जाणवतात. यामुळे कोणामध्ये न्यूनगंड तर कोणामध्ये अहंगंड निर्माण होतो.

या वयातील मुलांसाठी दैनंदिन जिवनातील गोष्टी, शौर्य, धैर्य यांच्या विरकथा, मानवाच्या आणि समाजाच्या कल्याणासाठी ज्या थोर पुरूषांनी प्रयत्न केले त्यांची उदबोधक चरित्रे लिहायला हवी. प्रवासवर्णने, ऐतिहासिक कथा, विज्ञान कथा, विद्यार्थी वाङ्मय, या साहित्यप्रकाराचा अंतर्भाव या वयातील मुलांसाठी बालवाङ्मयात करता येईल. शिशू, बाल, किशोर आणि कुमार मुलांच्या या चार अवस्थेत मुलांच्या वाढ आणि विकासाच्या काळाची निश्चिती स्थूलपणे केली आहे. मुलांच्या अनुवंश, परिवेश आणि त्या काळातील युगधर्म यानुसार व्यक्तिपरत्वे त्यात बदल होऊ शकतो.

## बालसाहित्याचे महत्त्व

कोणत्याही देशाच्या भविष्यकाळाचा अंदाज त्या देशातील वर्तमानकालीन लहान मुलांकडे पाहून लावता येऊ शकतो. मुलांच्या जडणघडणीत त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्या कौटुंबिक, शालेय पर्यावरणाबरोबरच त्यांना वाचनासाठी मिळत असलेल्या साहित्याची भूमिका ही महत्त्वपूर्ण असते. बालसाहित्याद्वारे मुलांमध्ये आत्मविश्वास, आत्मविकास रूजवला जातो, यामुळे मुले बदलत्या काळाशी समायोजन लवकर साधतात व आधुनिक जीवनातील आव्हानांशी जुळवून घेण्यास सक्षम होतात.

वर्तमानकालीन बालसाहित्याने प्राचीन कालातील शाश्वत मूल्ये आणि परंपरांना नव्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून मांडणी करायला हवी. भारतीय संस्कृतीचे आणि तिच्या वैभवाचे दर्शन घडवायला हवे. तात्पर्य आपला प्राचीन वारसा जपण्याचे बालसाहित्य एक सशक्त माध्यम आहे.

बालसाहित्य हे बालवाचकांचे मनोरंजन करते त्याचप्रमाणे त्यांच्यातील चेतना आणि जागरुकतेलाही चालना देते. त्यामुळे मुलांमध्ये संवेदनशिलता विकसित होण्यास मदत होते. नैतिकता ही सामाजिक शिस्तीची प्राथमिक अट आहे. नैतिकता बालसाहित्यातील एक आवश्यक घटक आहे. बालसाहित्य नैतिकतेचे संवर्धन करण्याची जबाबदारी पार पाडतांनाही दिसून येते.

साहित्य हे केवळ सत्याचा शोध घेते, सत्याचा नेहमीच विजय होतो आणि असत्य कितीही शक्तिशाली असले तरी त्यांना पराभव पत्करावाच लागतो. बालसाहित्याने मुलांच्या मनात सत्यता चे मूल्य रूजविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे .

बालसाहित्य मुलांची कल्पकता वाढवते त्यांची श्रद्धा जपते. मुलांना शिक्षण, जिज्ञासा आणि शाश्वत मूल्यांनी समृद्ध करतांना दिसून येते. माणूस हा समाजशील प्राणी आहे समाजाशिवाय मानवाची आपण कल्पना

करू शकत नाही. मुलांच्या भावी आयूष्याची जडण-घडणीसाठी मानवतेचे बीज रूजवण्याचे बालसाहित्य एक माध्यम आहे.

## सारांश / निष्कर्ष

वयाच्या वाढीबरोबर मुलांमध्ये शारिरिक, मानसिक, भावनात्मक विकास होत असतो, ही गोष्ट लक्षात घेऊन बालसाहित्याची रचना करायला हवी. बालसाहित्यात लहान मुलांच्या कथा, कविता, नाटक, एकांकिका, चरित्र इत्यादी प्रमुख साहित्यप्रकारांचा प्रकारांचा समावेश होतो. हे साहित्यप्रकार लिहीतांना बालमानशास्त्र विचारात घेणे महत्वाचे आहे. नव्या आकांक्षा, नवी मूल्ये, यांची जाणिव ह्या वयात मुलांना होत असल्याने बालवाङ्मनेही परंपरा आणि नवता यात समायोजन साधावे परिणामी साहित्यात साचलेपणा येणार नाही. एकविसावे शतक तंत्रविज्ञानाचे आहे व मुलांच्या मनावरही वैज्ञानिक आणि यांत्रिकी आविष्कारांचा प्रभाव आहे. मुलांची विचारशैली, राहणीमान आणि कार्यशैली बदलत आहे, त्यामुळे मुलांची आवड, क्षमता आणि कलागुण लक्षात घेऊन बालसाहित्य लिहिले गेले पाहिजे. बालसाहित्य हे संस्कृती, समाज, राष्ट्र, विश्व बंधुता, शिक्षण आणि बालकांचा सर्वांगीण विकास या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. गरज एवढीच आहे की समाजाच्या बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या बालसाहित्याचे महत्त्व आपण समजून घेतले पाहिजे.

शब्द आणि अर्थ यांच्या संयोगातून साहित्याची निर्मिती होते या साहित्याचे स्वरूप ठरवणे म्हणजे चिमटीत पारा पकडण्यासारखे आहे. प्रस्तुत निबंधात केवळ मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून बालसाहित्याचे स्वरूप मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शैलीवैज्ञानिक, समाजशास्त्रीय, सौंदर्यवादी, कलावादी, जीवनवादी, वास्तववादी, अस्तित्ववादी या दृष्टिकोनातूनही बालवाङ्मयाचा विचार करता येईल.

## संदर्भ ग्रंथ

दांडेकर, मालतीताई : बालसाहित्याची रूपरेखा, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई.
भागवत, लीलावती : मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप
शाह, सुलभा : मराठी बालवाङ्मय स्वरूप आणि अपेक्षा,
काळे, प्रेमला : बालमानसशास्त्र
बागुल, देविदास :बालवाङ्ःमय
संपादक डॉ. उज्जवला मेहेंदळे : बालसाहित्य : स्वरूप आणि व्याप्ती, ग्रंथाली प्रकाशन